# मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## सायबर गुन्हे शाखा
३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर –०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जावक क्रमांक :-९९/२०२२ दिनांक :-०५/०४/२०२२

**<u>अधिक नफा मिळवण्याचे अमिष दाखवुन फसवणुक करणाऱ्या गुन्हेगारास अटक : सायबर गुन्हे कक्षाची कामगिरी.</u>**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयील सायबर गुन्हे कक्ष येथे तक्रारदार फिर्यादीनामे श्री.किरणभाई गमनभाई परमार रा. रुम नं२०६ बि.विंग ज्योतीधामबिल्डींग, केबीनक्रॉस रोड खारीगाव, भाईंदर पुर्व यांनी यांनी घर बसल्या काम करून पैसे कमवा अश्या आषयाचे जाहीरातीमधून एकुण २,०७,३८२/- रु ची गुंतवणुक करण्यास सांगुन कोणताही परतावा न देता फसवणुक झाल्याबाबत तक्रारी अर्ज सायबर गुन्हे येथे दिलेला होता, त्याबाबत नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र. ८०७/२०२२ भादविस कलम ४२० सह माहिती तंत्रज्ञान कायदा ६६ (डी) अनव्ये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये अज्ञात आरोपीत याने फिर्यादी यांचे मोबाईल क्रमांक ८४५१८९०४२६ यावर BH-148594 या नावाने एक टेक्स मॅसेज टाकुन व त्यामध्ये पार्ट टाईम काम करुन दर दिवशी ३००० रुपये सॅलरी मिळेल असा मजकूर पाठविला होता, तसेच व्हॉटसअपची लिंक पाठवुन ती लिंक ओपन करण्यास सांगुन त्यात वेळोवेळी गुंतवणुक करण्यास सांगितले. अश्याप्रकारे फिर्यादी यांनी एकुण२,०७,३८२/- रु ची गुंतवणुक करण्यास सांगुन कोणताही परतावा न देता फिर्यादीची फसवणूक केलेली होती, सायबर गुन्हे कक्ष यांचेकडून नमुद गुंतवणूक केलेल्या रक्कमेबाबत अधिक तपास करण्यात आला युपीआयद्धारे पाठविलेल्या रक्कमेच्या अधिक माहिती करीता युपीआय सोबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे. युपीआय कडुन माहिती प्राप्त करण्यात आली असता आयसीआयसीआय बँक खाते. १९६००५०००८८१ यावर रक्कम गेल्याचे दिसुन येत असल्याने सदर खात्याचे अधिक माहितीकरीता आयसीआयसीआय बँकेसोबत पत्रव्यवहार करण्यात आला. आयसीआयसीआय बँकेकडुन उपरोक्त संशयीत खाते हे **<u>शिवताज एंटरप्रायझेस रा. आनंदीबाई केणी चाळ नं ११, केणी कंपाऊड कांदिवली प.मुंबई ४०००६७</u>**याचे असल्याची माहिती प्राप्त करण्यात आली. तसेच त्याचे मालक/खातेधारक **अमोल अशोक जाधव पत्ता- बुझ ०९, शॉप नं ०४, चारकोप पोईसर रोड, गणेशचौक, मुंबई ४०००६७** याचे असल्याचे निषप्न्न झाले आहे. त्यास ताब्यात घेवून दिनांक ०१/०४/२०२२ रोजी नवघर पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिले असून त्यास नमुद गुन्ह्यांमध्ये अटक करण्यात आलेली आहे.

**सायबर गुन्हे शाखा, मिरा,भाईंदर-वसई,विरार पोलीस आयुक्तालय यांचेकडुन जनतेला आवाहन करण्यात येते की, *<u>घर बसल्या काम करुन पैसे कमवा, पार्ट टाईम काम करुन दर दिवशी सॅलरी मिळेल</u>* अश्या प्रकारे फसवणूकीच्या जाहीरातीमधून ऑनलाईन व्यवहार करून आर्थिक फसवणुक झालेली असल्यास नवघर पोलीस ठाणेस अथवा सायबर गुन्हे शाखा, मिरा,भाईंदर-वसई,विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यालयाशी तात्काळ संपर्क साधावा.**

| | |
|---|---|
| नवघर पोलीस ठाणे संपर्क क्र.:- 02228044573 | सायबर गुन्हे शाखा संपर्क क्रमांक :- 022-2811 0135 |
| पोलीस निरीक्षक श्री. सुशिलकुमार शिंदे :-8080243477 | सायबर गुन्हे शाखा व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक :- 9004880135 |
| ई-मेल आयडी :- **pi.navghar.mbvv@mahapolice.gov.in** | ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in** |

सदरची कामगिरी डॉ.श्री.महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली सायबर गुन्हे कक्ष येथील पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर,सपोनि/स्वप्निल वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर,पोअं/१२९५ गणेश इलग, मपोशि/सुवर्णा माळी, मपोशि/ माधुरी धिंडे यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.

----oo----